# घर

जिव्हाळ्याच्या चार भिंती
निवाऱ्यासाठी पुरेशा असतात
प्रितीने, एकमेकांच्या संगतीने
त्या सजवायच्या असतात ॥१॥
कर्तव्याच्या गिलाव्याने
घराला घरपण द्यायचे असते
विश्वासाच्या आधाराने
घराचे इमले उभारायचे असते ॥२॥
समर्पणाच्या भावनेने तेथे
नांदायचे असते
सुखदुःखाची शाल पांघरूण
जीवन जगायचे असते ॥३॥
नात्याची प्रिती नाजुकतेने
जपायची असते
कुरकुर व घर घर न करता
घरपण जपायचे असते ॥४॥



सौ. अस्मिता बाळेकर
वंदेमातरम्, नवाथेनगर
अमरावती.